**SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S**

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

**INTERNAL COMPLAINT COMMITTEE**

**&**

**AMERICAN INDIA FOUNDATION ORGANIZED**

**TWO DAYS WORKSHOP**

ACADEMIC YEAR- 2022 – 2023

**14/11/2022**

---

# Report

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनात अमेरिकन इंडिया फाउंडेशन आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तसेच हे प्रशिक्षण अमेरिकन इंडिया फाउंडेशन व नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले. भारतातील महिला, बालक व युवा यांच्यामध्ये प्रशिक्षणातून सकारात्मक घडून त्यांना स्वावलंबी बनवणे हा उद्देश अमेरिकन इंडिया फाउंडेशनचा आहे.

या प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर म्हणून अभिजीत पाताडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थीनींना स्वपरिचयपत्र, मुलाखत देताना कसे बोलावे, एम एस वर्ड व एम एस एक्सेल अशा विषयांवर प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणामध्ये एकूण १३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व प्रमाणपत्र मिळवले.

आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण कार्य शाळेमुळे आमच्यात आत्मविश्वास वाढल्याची भावना व्यक्त केली. व आम्हाला मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर व अंतर्गत तक्रार निवारण समिती समन्वयक प्रा. सौ. नंदा मास्कर, प्रा. डॉ. चित्रा मोरे, प्रा. डॉ. सुप्रिया बेहेरे यांचे आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







देशोन्नती

गजानन ठासर, कामगार सेना

# अमेरीकन इंडिया फाऊंडेशन अंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



**मोताळा** ■ स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे १४ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनात अमेरीकन इंडिया फाऊंडेशन आणि तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती.

सदर प्रशिक्षण अमेरिकन इंडिया फाऊंडेशन व नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरिशन यांच्या सहकार्याने आयोजीत करण्यात आले होते. भारतातील महिला, बालक व युवा यांच्यामध्ये प्रशिक्षणातून सकारात्मक घडून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यात सक्षम करणे हा उद्देश अमेरीकन इंडिया फाऊंडेशनचा आहे. प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर म्हणून अभिजीत पाताडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना परिचय पत्र तयार करणे, आपला आत्मविश्वास कसा वाढवावा, मुलाखत देताना कसे बोलावे, एमएस वर्ड व एक्सेल अश्या अनेक विषयांवर आधारीत प्रशिक्षण दिले. तसेच मुलाखतीचा कौशल्यावर आधारित वयक्तिक रित्या मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ.प्रविण ठेंग हे होते. तर तक्रार निवारण समितीच्या सौ.नंदा मास्कर, डॉ.चित्रा मोरे, डॉ. सुप्रिया बेहेरे उपस्थित होत्या. प्रशिक्षणामध्ये १३० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ.गजानन जाधव, मास्टर ट्रेनर अभिजीत पाताडे, प्रा. सुनिल मामलकर, प्रा.डॉ.अभय ठाकूर, प्रा.भास्कर भिसे, प्रा.प्रतीक गायकी

Buldhana Edition
Nov 19 2022 Page No. 7